**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**मध्यवर्ती कार्यालये, पुणे ४११ ००१**
**दूरध्वनी क्र.०२०-२६१२ २०७६**
**फॅक्स क्र.०२०-२६१२७०४१** **E-mail:do_tpv5@rediffmail.com**

---

जा.क्र.वि.यो.औ.बाद/मौ.सातारा/ग.नं.६९/बांप/टीपीव्ही-५/ ४६० दि. १८.०१.२०१८.

प्रति,

आयुक्त,
औरंगाबाद महानगरपालिका,
औरंगाबाद.

**विषय :- विकास योजना - औरंगाबाद**
गट क्रमांक ६९ मौजे सातारा, औरंगाबाद औद्योगिक क्षेत्रावरील बांधकाम परवानगी बाबत.

**संदर्भ :-** आपलेकडील दि.०३.१०.२०१७चे पत्र क्र.मनपा/नरवि/ससंनर/२०१७/१८३३

प्रस्तूत प्रकरणी संदर्भित पत्रावरून विषयांकित जागेमध्ये दि.०२.१२.२०१५ रोजीचे बांधकाम परवाना अन्वये तत्कालिन विकास नियंत्रण नियमावलीनुसार औद्योगीक विभागामध्ये रहिवासी वापराकरिता बांधकाम परवानगी अनुज्ञेय करण्यात आल्याचे निदर्शनास येते. तद्नंतर विषयांकित जागा औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट झाल्यामुळे सदर क्षेत्राकरिता औरंगाबाद महानगरपालिकेची "ड" वर्ग महानगरपालिकांसाठीची विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली लागू झाली आहे. सदर नवीन / "ड" वर्ग महानगरपालिकांसाठीची विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम क्र.१.०(v)Savings च्या तरतूदीनुसार, यापुर्वी औद्योगीक विभागामध्ये रहिवासी वापराकरिता (I to R) दिलेली /मंजूर केलेली विकास परवानगी अबाधीत राहते. त्यानुसार मंजूर/ अनुज्ञेय केलेल्या रहिवास / वाणिज्य वापराकरिता आता सुधारित परवानगी अर्जदारांना घ्यावयाची असेल तर ती सदर नवीन नियमावलीचे विनियम क्र.३.० Applicability of Regulations नुसार देणे अभिप्रेत / अपेक्षित आहे. ही बाब लक्षात घेता, रहिवास/ वाणिज्य विभागामध्ये नवीन नियमावलीनुसार ज्या बाबी अनुज्ञेय आहेत त्या सर्व संबंधीत विनियमानुसार अनुज्ञेय राहतील. मात्र त्याकरिता नव्याने औद्योगीक विभागामध्ये रहिवासी वापराकरिता (I to R) परवानगी गरजेची नाही.

**(मसूदा मा.संचालक यांच्या मान्यतेने)**

**(शा.ह.मुंढे-जाधवर)**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता.

**प्रत -**

१. सहसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
२. उपसंचालक, नगर रचना,नागरी संशोधन घटक /मुख्य कार्यालय, पुणे.
३. सहायक संचालक, नगर रचना, औरंगाबाद शाखा, औरंगाबाद.
४. कार्यासन अधिकारी, टिपीव्ही-१/२/३/४/५/६/७.